# श्री शांतीनाथ सेवा संस्थान, जैन तिर्थ, संगमनेर

२५७, नवरंग बाग, घुलेवाडी, संगमनेर – ४२२६०५.

मो. नं. : ९३७११०७४३९, ९५१८७८८१००, ९०२२८७५२५५


**मानव सेवा, ही ईश्वर सेवा**

## गायत्री मंत्र

आप सभी के परिवार जनो को सविनय विनंती करते है।

आप रोज सुबह पाच बार ये परमात्मा की प्रार्थना स्पष्ट उच्चार के साथ कंठस्थ श्रवण करे।

**ॐ भूः भुवः सुवः तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि।**

**धियो यो नः प्रचोदयात ।।**

**आम्ही अत्यंत दैदित्यमान परमात्म्याचे ध्यान करतो. त्यापासून आमच्या बुद्धीला प्रेरणा मिळते. गायत्री मंत्रोपचाराने आमचे जीवन अंतबाह्य उजळून निघाले आहे. त्याला अलौकिक तेज प्राप्त झाले आहे त्यातूनच अमरत्वाची प्राप्ती होत आहे.**

स्वामी रामकृष्ण म्हणतात की, "गायत्रीच्या जपाने फार मोठी शक्ती प्राप्त होते. तिची प्रत्यक्ष साधना करुनच तिचा अनुभव घ्यावयास हवा."

स्वामी विवेकानंद सांगतात की, "गायत्री हा सद्बुद्धि देणारा मंत्र आहे. आणि परमात्म्याकडून हीच एकच गोष्ट अशी आहे, की ती आपण मागू शकतो. सद्बुद्धीने सन्मार्गाचा लाभ आणि सन्मार्गाने जात असताना सत्कर्मही आपोआपच घडते."

लोकमान्य टिळक म्हणतात की, "वाईट मार्ग टाकून श्रेष्ठ मार्गाने जाण्याची प्रेरणा देण्याचे सामर्थ्य फक्त गायत्री मंत्रातच आहे."

महामना पं. मदनमोहन मालवीय सांगतात की, "ईश्वराविषयी अनन्यनिष्ठा गायत्रीमुळेच निर्माण होते. इतकेच नव्हे तर भौतिक ऐश्वर्यही गायत्रीनेच प्राप्त होते."

डॉ. राधाकृष्णन गायत्रीचा महिमा सांगताना म्हणतात की, "गायत्री ही मानवतेला दिलेली महान् देणगी आहे. यथार्थ ज्ञानाचा स्त्रोत तुमच्या अंतर्मनात केवळ गायत्रीने निर्माण होऊ शकेल. त्यासाठी मौन पाळून, एकान्तात ध्यानस्थ बसून गायत्रीची उपासना करा, की भारतीय तत्त्वज्ञानाच्या प्रकाशाने तुम्ही सारी मानवता उजळून काढू शकाल. इतकेच नव्हे तर शाश्वत ज्ञानाचे अक्षय्य तेवणारे असंख्य नंदादीप तुम्ही मानवतेच्या मंदिरात लावू शकाल."